# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/05/2023 (सोमवार) सकाळ


---

### घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत भोवरी ता. कामठी जि. नागपुर येथे दिनांक २७/०५/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक २८/०५/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने ग्रामपंचायत भोवरी येथील पम्प हाउस मधील समोरील दाराचा कोंडा व कुलुप तोडुन आत प्रवेश करून आत मध्ये असलेले १) सोलर पम्प ५ एच. पी. किंमती अंदाजे १०,०००/—रू २) ५ एच पी सबमर्सिबल मोटार पम्प किंमती अंदाजे १०,०००/—रु ३) ७.५ एच पी सबमर्सिबल मोटार पम्प किंमती अंदाजे १५,०००/—रु असा एकुण ३५,०००/—रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— ऋशी दत्तुजी भेंडे, वय ४२ वर्षे रा. भोवरी ता. कामठी जि. नागपुर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ४५७, ३८० भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरीश यंगलवार ब. नं ११७४ पोस्टे मौदा मो. क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

### बॅटरी चोरी

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत दिघोरा भिवापुर येथे दिनांक २६/०५/२०२३ ते दिनांक २७/०५/२०२३ चे २०/०० वा. ते ०७/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर जंगलुजी जनबंधु, वय ६० वर्षे यांचे ०३ ट्रॅक्टर रात्री ०८/०० वा. दरम्यान गुप्ता गोडाउनचे समोरील खुल्या जागेत उभे करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ०७/०० वा. दरम्यान फिर्यादीच्या ट्रॅक्टरचे चालक हे ट्रॅक्टर चालु करण्यास गेले असता ट्रॅक्टर चालु झाले नाही. त्यांनी ट्रॅक्टरची पाहणी केली असता त्यांना तिनही ट्रॅक्टर मधील बॅटरी दिसुन आली नाही. फिर्यादीचा ट्रॅक्टर चालक नामे— जितु जुगनाते याने फिर्यादीला बॅटरी चोरी गेल्याबाबतची माहीती दिली. फिर्यादीने स्वत: ट्रॅक्टर जवळ जावुन पाहणी केली असता एक्साईट व एमरण कंपनीच्या बॅट्ऱ्या चोरी गेल्याचे दिसुन आले. कोणीतरी अज्ञात चोरटयाने रात्री अंधाराचा फायदा घेवुन ट्रॅक्टर मधील ०३ बॅटरी अंदाजे किंमती १५,०००/—रू. च्या चोरून नेल्या आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रविण जाधव मो. नं. ९६८९९२५९२४ हे करीत आहे.

## लोखंडी पाईप चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत ०७ किमी अंतरावर चिरव्हा शिवार येथे दिनांक २८/०५/२०२३ चे २/०० वा. ते दिनांक २८/०५/२०२३ चे ४/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संकेत अनिल डोंगरे, वय ३३ वर्ष, रा. कुजीलाल पेठ रामेश्वरी नागपुर यांच्या चिरव्हा शिवार येथील शेतात शेती उपयोगी वस्तुपैकी ठेवलेली १) एक लोखंडी पाईप किंमती अंदाजे १००००/—रू २) अंदाजे दहा फुट लोखंडी पाईप रोप किंमती अंदाजे १०००/—रू ३) थ्रेशर मशीनला लागलेली लोखंडी ग्रील किंमती अंदाजे ५०००/— रू. असा एकुण १६०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरी करून **आरोपी नामे — भिमराव उर्फ बादल नेमीचंद मेश्राम, रा. सेलोटी ता. भंडारा** हा मौदा येथुन घेवुन जातांनी मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरीश यंगलवार ब. नं. ११७४ पोस्टे मौदा मो. क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा मकरधोकडा गरमशुर शिवार येथे दिनांक २७/०५/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक २८/०५/२०२३ वा. चे ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रविंद्र वसंतराव शिंदे, वय ५१ वर्ष, रा. मकरधोकडा ता. उमरेड याचे शेतातील गुराच्या गोठयात ठेवलेले सामान जाऊन पाहिले असता गोठयात ठेवलेले ४८ नग स्पींकलरचे पाईप किंमती अंदाजे २०,०००/—रू., ३२ टमाटरचे कॅरेट किंमती अंदाजे ६२००/—रू., एक नग कॉम्प्रेसर पंप किंमती अंदाजे ३०,०००/—रू, कल्टी वेटर किंमती अंदाजे ५०००/—रू. लोखंडी पाईप किंमती अंदाजे ५०००/—रू., चाकाची लोखंडी जोडी किंमती अंदाजे ४०००/—रू., दोन जुने वापरते लोखंडी पलंग किंमती अंदाजे १०००/—रू. दिसली नाही व बाजुचे शेतकरी भोजराज लडी याचे शेतातुन जुनी वापरती ऑईल ईंजीन मोटारपंप किंमती अंदाजे २०,०००/—रू. असा एकुण ९१,२००/—रूपयाचा मुद्देमाल फिर्यादीचे व शेजारील कास्तकाराचे शेतातुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खोटेले पोस्टे उमरेड मो. नं. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर